## नियमपुस्तिका पाच

### विभागाने धारण केलेले किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली किंवा कर्मचा-यांना त्यांचे कामकाज पार पाडताना त्यांनी वापरायचे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख

महापालिका मुख्य लेखापरीक्षक हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सांविधिक लेखापरीक्षक आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 135(1) च्या तरतुदीला अनुसरुन महापालिका मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिकेच्या लेखांचे मासिक परिक्षण करतात आणि स्थायी समितीस त्याची माहिती देतात. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक मुं.म.न.पा.अधिनियमाच्या कलम 136 मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे सोपविलेली इतर कोणतीही कर्तव्ये व त्यास प्रदान केलेले इतर कोणतेही अधिकार त्यांच्याभरीला अनुसूची “इइ” मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये बजावतील आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा त्यास वापर करता येईल.

थोडक्यात महापालिका मुख्य लेखापरीक्षक आणि त्यांचा कर्मचारीवृंद मुं.म.पा. अधिनियम 1888 आणि म.पा.सेवा विनियम मधील तरतुदींना अनुसरुन लेखापरीक्षेचे कामकाज पार पाडतात. महापालिकेच्या सर्व खात्यांमधील लेखापरीक्षणाच्या कर्तव्यांची संपादणूक व कामकाज प्रकियेबाबतची मार्गदर्शनपर प्रणाली 684 पृष्ठये असलेल्या लेखापरीक्षेच्या निर्देशसूचीमध्ये एकत्रित दिलेली आहेत.

**(श्री. मं.सि.गोसावी)**
जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे कार्यालय